# पुणे महानगरपालिका
# स्थायीसमिती
# कार्यपत्रिका क्र. ३६
# सभा क्र. ५१, दिनांक २२/११/२०२२ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची तहकूब सभा (शुक्रवार, दि. १८/११/२०२२ रोजीची) मंगळवार दि. २२/११/२०२२ रोजी सकाळी ११.०५ (अकरा वाजून पाच मिनिटे) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिकाभवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र.१०७२**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा-कळस/ नगररोड (वडगांव शेरी) क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे ऑक्टोबर २०२२ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उपआयुक्त, परिमंडळ विभाग क्र.१ यांचे जा.क्र. उप-१/६३२७, दि. ९/११/२०२२चे पत्र.

**निर्णय- सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र.१०७३**

दि. १०/१०/२०२२ ते दि. १६/१०/२०२२ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १६ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/८३९, दि. १०/११/२०२२ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय- सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.१०७४**

दि. २४/१०/२०२२ ते दि. ३०/१०/२०२२ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ४८ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/८४०, दि. १०/११/२०२२ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय- सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**सेवक वर्गाची प्रकरणे**

**विषय क्र.१०७५**

पुणे महानगरपालिका सेवेतून निलंबित सेवक डॉ. सतिश बाबुराव कोळसुरे वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ यांच्या निलंबन कालावधीची पहिली सहामाही दि. १२/४/२०२२ रोजी पूर्ण झाली व दि. १२/१०/२०२२ रोजी दुसरी सहामाही पूर्ण झालेली असून सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/८४९, दि. १५/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**सर्वातकमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र.१०७६**

कै. बाबुराव सणस ग्राऊंड येथे स्थापत्य विषयक व दुरूस्ती विषयक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. रोहित कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र. रु. ३५,८४,७३३/- पेक्षा २७.१७ % कमी) असल्याने त्यांचेकडून र. रू. २६,१०,७२५=१९ पर्यंत अधिक जीएसटी र.रू. ६,४५,२५१=९४ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू. १०,८८५/- पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट , स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/भवन /८४२,दि. ११/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०७७**

प्रभाग क्र.१ मध्ये कळस धानोरी स.नं.३८/१ येथील ताब्यात आलेल्या ॲमिनिटी स्पेसवर आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांसाठी निवासी शिक्षण केंद्राचे उर्वरित कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. द साईराम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र. रु. ४४,५७,८२०/- पेक्षा २७.९४% कमी) असल्याने त्यांचेकडून र. रू. ३२,१२,३०५=०९ अधिक जीएसटी र.रू. ५,३४,९३८/- मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ७,११५/- पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार भाववाढ सूत्र व सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/भवन /८४३,दि. ११/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०७८**

बंडगार्डन पाणीपुरवठा केंद्राचे कक्षेतील प्रभाग क्र. १,३ व ४२ मधील दैनंदिन पाणीपुरवठा सुरळीत ठेवणेसाठी व्हाल्व्ह सोडबंद करणे (२०२२-२०२३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. बी.एस.के. कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ९९,९६,१६८/ पेक्षा ०.००१% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रू. ९९,९६,२६७=९६ अधिक शासकीय कामगार किमान वेतन दराप्रमाणे होणाऱ्या वाढीनुसार होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/८४५, दि. १४/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०७९**

बंडगार्डन पाणीपुरवठा केंद्राचे कक्षेतील प्रभाग क्र. ४ व ५ मधील दैनंदिन पाणीपुरवठा सुरळीत ठेवणेसाठी व्हाल्व्ह सोडबंद करणे (२०२२-२०२३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. बी.एस.के. कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ९९,८५,०२४/ पेक्षा ०.००१% जास्त ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ९९,८५,१२३=८५ अधिक शासकीय कामगार किमान वेतन दराप्रमाणे होणाऱ्या वाढीनुसार होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/८४६, दि. १४/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०८०**

प्रभाग क्र.४२ साडेसतरानळी भागांमध्ये मगरपट्टा रोड (रासकरचौक) ते अमेनोरा टाऊनशिप डी.पी.रोड परिसरामध्ये मुख्य डी.आय जलवाहिनी विकसित करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार प्रज्वल एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८४,१०,१०४/-पेक्षा१२.८१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७३,३२,७६९=६८ अधिक रॉयल्टी चार्जेस रक्कम रू. ७५,६६३/- व अधिक १८%जीएसटी नुसार होणारी रक्कम रू. १३,१९,८९८=५४ एकूण र.रू. ८७,२८,३३१=२२ पर्यंत काम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/८४७, दि. १४/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०८१**

प्रभाग क्र.४२ साडेसतरानळी भागांमध्ये मेन अमेनोरा टाऊनशिप डी.पी.रोड ते साडे सतरानळी टाकीपर्यंत मुख्य डी.आय जलवाहिनी विकसित करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार प्रज्वल एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८३,८९,९०१/-पेक्षा१२.८१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७३,१५,१५४=६८२ अधिक रॉयल्टी चार्जेस रक्कम रू. ९५,११९/- अधिक कॉम्प्रेसिव्ह स्ट्रेन्थक्यूब टेस्ट र.रू. ४,१४०/-अधिक १८%जी.एस.टी.नुसार होणारी रक्कम रू. १३,१६,७२७=८४ एकूण र.रू. ८७,३१,१४१=५२ पर्यंत काम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/८४८, दि. १४/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०८२**

न्यु अहिरेगाव, वारजे, शिवणे, उत्तमनगर भागातील स्मशानभूमीची व दफनभूमीची दुरूस्ती विषयक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. युनायटेड कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ७८,९३,१३५/- पेक्षा २५.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ५९,०४,०६४=९८ पर्यंत अधिक जी.एस.टी.र.रू. ९,४७,१७६=२ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू. ३९,४९५/- अधिक रॉयल्टी चार्जेस रक्कम रू. ४१,०७४=२ अधिक कन्स्लटन्सी चार्जेस र.रू. ७८,४३२=८७ अधिक टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार व लेबर, मटेरियल, पेट्रोल/डिझेल यांना भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस वकाम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/भवन /८५०,दि. १५/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. १०८३**

औंध–बाणेर क्षेत्रिय कार्यालयांतर्गत आऊटसोर्सिंग पद्धतीने हद्दीतील झाडणकाम करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. प्रियांक एंटरप्रायझेस यांचेटेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. १०,५९,७५,१६८/–पेक्षा ॲटपार दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रु. १०,५९,७५,१६८/– पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्यातील भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस, सदर कामे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने आऊटसोर्सिंग कचरावेचक कंत्राटी कामगारांचे दिनांक १६/५/२०२२ पासून वेतन अदा करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस व देयक अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/७३४, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०८४**

महापालिका सहाय्यक आयुक्त धनकवडी सहकारनगर कार्यालया अंतर्गत झाडण कामाकरिता मजुर पुरविणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे./ श्री. Priyank Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ९,४३,१७,८९९=५२ पेक्षा (०.००% ॲटपार) दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९,४३,१७,८९९=५२ नुसार उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस तसेच मे. शासनाकडून किमान वेतनदरातील विशेष भत्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार फरक अदा करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचेजा.क्र. मआ/परि.क्र.३/७३६, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०८५**

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय वारजे कर्वेनगर अंतर्गत आऊटसोर्सिंगने कचरासंदर्भांत कामे करून घेणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. श्री. प्रियांक एंटरप्रायझेस यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे( टेंडर र.रु. ९,३०,२१,२३२=२०पेक्षा ०.००% ॲटपार दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९,३०,२१,२३२=२० पर्यंत काम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/७४०, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०८६**

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिटनोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्ते व पुल विकसित करणे या प्रकल्पाअंतर्गत डेव्हलपमेंट क्रेडिट नोट निर्माण करणे या करिता सॉफ्टवेअर बनविणे व डेव्हलपमेंट क्रेडिट नोटची छपाई तसेच अनुषंगिक प्रिंटर खरेदी करणे (बी–२ पद्धतीची) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. न्याती टेक्नोलॉजीस प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून र.रु. ८२,८४,७५४/– अधिक जी.एस.टी. पर्यंत अदा करणेस / करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इस्टेट) यांचे जा.क्र. मआ/पथ/६४३,दि. २३/९/२०२२ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०८७**

लक्ष्मी रस्ता दुभाजक दुरूस्ती व पेंटिंग, पेडेस्ट्रीयन क्रॉसिंग, थर्मोप्लास्टिक पेंट, साईन बोर्ड, कर्ब स्टोन दुरूस्ती व पेंटिंग तसेच रस्ते देखभाल दुरूस्ती विषयक व तद्नुषंगिक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. साईलिला कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ३५,२४,०८१/– पेक्षा १.०० % कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३४,८८,८४०=१९ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र. रू. ६,२७,९९१=२३ पर्यंत अधिक लेबरसेस र.रू. ३५,२४१/– पर्यंत अधिक वर्कर इन्शुरन्स र.रू. १७,६२०/–(असे एकूण र.रू. ४१,६९,६९२=४२ ) पर्यंत काम करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/५८३,दि. २०/९/२०२२ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय – सदर विषय ५ % कमी दराने मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १०८८**

पुणे मनपाच्या पौड व घोले रोड कचरा हस्तांतरण केंद्रावरून पुणे मनपाच्या कोणत्याही कचरा प्रक्रिया प्रकल्पांपर्यंत घनकचऱ्याची सेकंडरी वाहतूक भाडे तत्वावरील ३१ मे. टन जीव्हीडब्ल्यू, २८ क्यु.मी. क्षमतेच्या बी.आर.सी. वाहनाच्या साहाय्याने करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. ४,५९,४४,०१०/–पेक्षा५ % जादा) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४,८२,४१,२१०=५० पर्यंत करणेकामी मान्यता मिळणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा. क्र मआ/मोवावि/३००,दि. १५/७/२०२२ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र. १०८९**

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील वाहनतळांचे बाबतीत कोवीड–१९ या साथरोगाचे कालावधीतील वार्षिक मक्ता रकमेमध्ये काही प्रमाणात सवलत मान्य करणेबाबत मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेता, मा.आबा बागुल व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. १२/४/२०२१ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १११ दि. १२/४/२०२१ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/प्रकल्प/८०७ दि.३/११/२०२१ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०९०**

पुणे शहराच्या हद्दीमधील रस्त्यांवर विविध सेवा वाहिन्या टाकणेसाठी शासकीय संस्थांना देण्यात येणारी सवलत रद्द करणेयाकरिता खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/७११ दि.११/१०/२०२१ चे पत्र.

**१.** मा. मुख्य सभेने ठ.क्र. ७० दि. २२/६/२०१५ अन्वये पारित केलेला ठराव निरस्त करणेस.

२. मे.एम.एन.जी.एल., महाराष्ट्र राज्य विदयुत महामंडळ व इतर सर्व शासकीय संस्थाना रस्तापुर्नस्थापना दरामध्ये देण्यात येणारी सवलत रद्द करुनपुणे महानगरपालिकेमार्फत दरवर्षीच्या दरपत्रकानुसार वेळोवेळी निश्चित केलेल्या दराप्रमाणे दर आकारणेस.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०९१**

अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषय पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन /७१ दि. २०/५/२०२० चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०९२**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०९३**

आरोग्य कार्यालयाकडील विविध विभागामार्फत सध्याच्या आकारण्यात येणारे प्रस्तावित मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या शुल्क दरातवाढ करून प्रस्तावित केलेल्या शुल्क दि.०१/०४/२०२१ पासून आकारणीस करण्यास मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१००७ दि.२२/३/२०२१ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०९४**

भूमीगत केबलसाठी आकारणी करावयाच्या मालमत्ता कराच्या धोरणाबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टिजीओ/४२२ दि.१०/८/२०२१ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०९५**

पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत पुणे महानगरपालिकेच्य ाकार्यक्रमांच्या व्यतिरिक्त नागरिक/ खाजगी/सरकारी/निमसरकारी संस्था/मंडळे/मा.सभासद/लोकप्रतिनिधी इत्यादीकडून त्यांचे खाजगी कार्यक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपासाठी सजावटीकरीता त्यांचेकडून लेखी मागणी आल्यास कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम यांचे दरात खालीलप्रमाणे वाढ करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/उद्यान/१४१ दि.२९/६/२०२० चे पत्र.

| अ.क्र. | तपशील | प्रचलितदर (र.रु.) | प्रस्तावितदर (र.रु.) |
|---|---|---|---|
| १) | पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत भाडयाने देण्यात येणाऱ्या कुंडयाचे भाडे व<br><br>अनामत रक्कम | भाडे – र.रु.१/– प्रतिकुंडी<br><br>अनामत – र.रु. १०/– | भाडे – र.रु.१००/– प्रतिकुंडी/प्रतीदिन<br><br>अनामत रक्कम र.रु. ३००/– प्रतीकुंडी |

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०९६**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यानांचे प्रवेश शुल्कामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषय पत्रासोबतच्या परिशिष्ठ क्र. १ मधील अ.क्र. १ ते १३ उद्यानांचे सद्य:स्थितीत असलेले प्रचलित प्रवेश शुल्क वाढवून उद्यानांचे प्रवेश शुल्क प्रस्तावित दरांप्रमाणे प्रौढांसाठी र.रु.१०/– व लहान मुलांसाठी र.रु. ५/–, मासिक पास र.रु. २००/– व विदेशी नागरिक र.रु. १००/– दैनंदिन तिकीट या प्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/उदयान/१४२ दि.२९/६/२०२० चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**संकीर्ण**

**विषय क्र.१०९७**

पुणे पेठ शिवाजीनगर येथील स.नं.१००/१०१, कुसाळकर पुतळ्यासमोरील व्यावसायिक इमारतीमधील गाळा क्र.३ (अंध अपंग (दिव्यांग) व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेला आहे) ही मिळकत ३ वर्षे कालावधीसाठी लिव्ह अँण्ड लायसन्स तत्वावर देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचेजा.क्र.मआ/माव्य/७४८,दि.१३.१०.२०२२ चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १०३, दि. ९/११/२०२२ चा विचारासाठी.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०९८**

पुणे मेट्रोरेल प्रकल्पाने बाधित कुटुंबाचे पुनर्वसन करणेकरीता सदाशिव पेठ सि.स.नं.७८९ झाशीची राणी शाळेची जागा उपलब्ध करून देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचेजा.क्र.मआ/माव्य/७४९,दि.१३.१०.२०२२ चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १०४, दि. ९/११/२०२२ चा विचारासाठी.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०९९**

पुणे पेठ सदाशिव स.नं.७२१/२अ, फा.प्लॉ.नं.९८७ अ, इंदुलाल कॉम्पलेक्स येथील तिसऱ्या मजल्यावरील गाळा क्र. ३१४ (२६४ चौ.मी.) अव्यावसायिक दराने ५ वर्षे कालावधीसाठी देणेबाबत चे मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ माव्य/ ७७४, दि.१९.१०.२०२२ चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १०५, दि. ९/११/२०२२ चा विचारासाठी.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.११००**

पुणे पेठ स्वा.सावरकर उद्योग भवन येथील दुसऱ्या मजल्यावरील ओ–२–सी हा गाळा युनाइटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांना दिलेल्या गाळ्याच्या मुदत वाढीबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/७७६,दि.१९.१०.२०२२ चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १०६, दि. ९/११/२०२२ चा विचारासाठी.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.११०१**

पीएमसी कॉलनी राजेवाडी, नानापेठ येथील इमारतींचे बांधकाम पाडणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/८०६,दि.३१.१०.२०२२ चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ११६, दि. ९/११/२०२२ चा विचारासाठी.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.११०२**

पुणेपेठ बावधन स.नं.२०/३/७+३/८ येथील सुविधा बंगला निवासस्थानासाठी देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/८१६,दि.०१.११.२०२२ चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ११८, दि. ९/११/२०२२ चा विचारासाठी.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.११०३**

आरोग्य खात्याकडे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी करार पद्धतीने एकवट वेतनावर विविध संवर्गातील पदांच्या सेवांना मुदतवाढ देणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/८४४, दि. १४/११/२०२२ चे पत्र.

१. आरोग्य कार्यालयाकडील पशुवैद्यकीय अधिकारी, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), विद्युत पर्यवेक्षक या पदांवर कंत्राटी पद्धतीने एकवट मासिक वेतनावर नियुक्तीस असलेल्या मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्ता–अ मध्ये नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांना पुढे ६ महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस.

२. सदरील मुदतवाढ देताना निविदेमधील मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्ता–ब मध्ये प्रस्तावित प्रतिमहा एकवट वेतन या स्तंभामध्ये त्या–त्या पदासाठी नमूद केलेले वेतन त्यांचे हजेरीच्या प्रमाणातअदा करणेस.

३. नियुक्त होणाऱ्या सेवक व अधिकारी यांचे वेतनासाठी येणारा खर्च आरोग्य विभागांतर्गत कोंढवा कत्तलखाना ऑपरेशन व मेंटेनन्स RE17F199 या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस.

४. सदर पदावरील सेवांकरिता संबंधित सेवकांकडून करारनामा करणेस तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय होणाऱ्या रजा देणेस.

५. संबंधित कर्मचाऱ्यांना आरोग्य प्रमुख यांचे स्वाक्षरीने नियुक्ती आदेश देण्यास.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.११०४**

पुणे महानगरपालिकेच्या नगर पथ विक्रेता समिती २०२२ निवडणूक बिलेखर्ची टाकणेसाठी र.रू. २८ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/८५२, दि.१५/११/२०२२ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक, अतिक्रमण विभाग,पुणे महानगरपालिका, बजेटकोड नं.RE25B119,( पथारी व्यावसायिकांकरिता पथारी प्रकल्प तयार करून अंमलबजावणी करणे. | र.रू. २८लक्ष | --- |
| <u>**नवीन सुचविलेले काम**</u><br>अतिक्रमण विभाग, पुणे महानगरपालिका, नगरपथ विक्रेता समिती २०२२ निवडणूक बिलेखर्ची टाकणे. | --- | र.रू. २८ लक्ष |

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**
**(मा. मुख्यसभा मान्यता देईल या भरवशावर कार्यवाही करावी.)**

**विषय क्र.११०५**

सॉप्टवेअर सुधारणा देखभाल व दुरूस्ती करिता मे. क्रिएटीव्ह, सॉप्टवेअर कन्सल्टंट यांना वाढीव दराने मोबदला देणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचेजा.क्र. मआ/मुले/८५४, दि. १६/११/२०२२ चे पत्र.

१. मे. क्रिएटीव्ह, सॉप्टवेअर कन्सल्टंट, पुणे ५ यांचेकडून मा. महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्र.१ चे ठरावाऐवजी चालू कामासोबत वेब बेस संगणक प्रणाली करून घेणेस व त्यापोटी दि. ०१/०९/२०२२ ते ३१/०८/२०२३ या कालावधीसाठी करारनामा करून प्रतिमहा रक्कम रू. २,७५,०००/– ( सर्व करासहित ) मे. क्रिएटीव्ह, सॉप्टवेअर कन्सल्टंट पुणे ५ यांना अदा करणेस.

२. SAP प्रणाली प्रत्यक्षात कार्यान्वित होईपर्यंत सदरच्या मोबदल्यात दिनांक ०१/९/२०२३ पासूनपुढे प्रतिवर्षी ५ % वाढ करणेस व त्यानुसार करारनामा करणेस.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**सही /– xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दिनांक २३/१२/२०२२ रोजी वृत्तांत मंजूर.**

**सही /– xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**